नि.दि.दावा क्र. ०५/२०१८
**जगदिशप्रसाद वि. संजेप व इतर**

## निशाणी क्र. ७६ खालील आदेशः–

प्रस्तुतचा अर्ज प्रतिदाव्यातील वादी यांनी आदेश ६ नियम १७ दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये प्रतिदाव्यामध्ये दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले.

२. प्रतिदाव्यातील वादी यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे कथन केले की, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी जगदीशप्रसाद बांगड यांनी मे. न्यायालयाची परवानगी न घेतला वादग्रस्त मिळकत दिनांक १५/०२/२०२४ रोजी खरेदीखत दस्त क्रमांक ३२२/२०२४ नुसार पुरषोत्तम संजय कदम यांना हस्तांतरीत केलेली आहे. त्यामुळे प्रतिवादी दाव्यातील वादी यांना परिच्छेद क्रमांक १२ मध्ये दुरुस्ती करावयाची आहे. त्यानुषंगाने वादपत्रामध्ये आवश्यक ती दुरुस्तीकरणे गरजेचे आहे. सबब अर्ज मंजूर करावा. ही विनंती प्रतिवादीदाव्यातील वादी यांनी केली आहेत.

३. त्यावर प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जाच्या पाठीमागे त्यांचे म्हणणे सादर केले आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, प्रस्तुतचे अर्जात दावा दुरुस्तीचे कारण चुकीचे नमुद केले आहे. सदर दुरुस्ती झाल्यास दाव्याचे स्वरुप बदलनार आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा.

४. अभिलेखाचे अवलोकन करता असे दिसुन येते की, प्रतिदावा दाखल केल्यानंतर प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांनी वाद मिळकत विक्री केल्यामुळे

प्रतिदाव्याच्या स्वरुपात बदल झालेला आहे. प्रस्तुत दाव्याचा निकाल गुणदोषावर होणेकरीता दाव्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. प्रस्तावीत दुरुस्तीस परवानगी दिल्यास दाव्याच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल होणार नाही. त्यामुळे वादपत्रामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी देणे न्यायोचित ठरेल. सबब खालीलप्रमाणे आदेश.

**आदेश**

१. प्रतिदाव्यातील वादी यांचा अर्ज नि.क्रं ७६ मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिदाव्यातील वादीने प्रस्तुत अर्जातील प्रस्तावीत दुरुस्ती १४ दिवसांच्या आत करुन प्रतिवादपत्रामध्ये दुरुस्ती करुन घ्यावी व दुरुस्ती प्रतिवादपत्र अभिलेखावर सादर करावे.

**रेणापूर** **(के.के.वाघमारे)**

**दिनांकः– १९/०४/२०२४** **सह दिवाणी न्यायाधिश, क. स्तर., रेणापूर**